जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR- 80 /2014
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः-15.11.2014

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम **1949** चे अनुसूची 'ड' चे प्रकरण-**2** मधील नियम क्र.**1** अन्वये

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम 1949 चे अनुसूचि (ड) चे प्रकरण 2 मधील नियम क्र.1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापौर श्री.अ.सत्तार अ.गफुर यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा दि.24.11.2014 रोजी दुपारी 3.00 वाजता नांवाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजित केली आहे.

करीता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**
**महापौर,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रति,
श्री /श्रीमती ____________________
सदस्य /सदस्या, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**कार्यक्रम पत्रिका**

**विषय क्र.1:-**

नांदेड वाघाळा महानगरपालिका क्षेत्रातील मुला-मुलींचे गुणोत्तर प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

लिंग गुणोत्तर-**2014**

| **अ.क्र.** | **महिना** | **एकुण जन्म** | | **एकुण** | **लिंग गुणोत्तर प्रतिहजार मुलींचे प्रमाण** |
|---|---|---|---|---|---|
| | | **पुरुष** | **स्त्री** | | |
| 1. | जानेवारी | 1578 | 1467 | 3045 | 929.65 |
| 2. | फेब्रुवारी | 1522 | 1279 | 2801 | 840.34 |
| 3. | मार्च | 1695 | 1587 | 3282 | 936.28 |
| 4. | एप्रिल | 1090 | 981 | 2071 | 900.00 |
| 5. | मे | 1905 | 1701 | 3606 | 892.91 |
| 6. | जुन | 1570 | 1472 | 3042 | 937.57 |
| 7. | जुलै | 2511 | 2275 | 4786 | 906.01 |
| 8. | ऑगस्ट | 2618 | 2248 | 4866 | 858.67 |
| 9. | सप्टे. | 2764 | 2432 | 5196 | 879.88 |
| 10. | ऑक्टो | 2136 | 1771 | 3907 | 829.11 |

**विषय क्र.2:-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20(3) नुसार नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेचे स्थायी समितीचे 16 सदस्यापैकी खालील (8) सदस्य दि.1.12.2014 रोजी दुपारी निवृत्त होत आहे.

1) सौ.कनकदंडे मोहिनी महेशराव ,भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस अपक्ष आघाडी
2) श्री गिल सरजितसिंघ पंजाबसिंघ, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस अपक्ष आघाडी
3) श्री गफार खान गुलाम महमंद खान, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
4) सौ.श्रध्दा सुशिल चव्हाण , राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
5) सौ.मुंढे शांता मोतीराम, शिवसेना,भारतीय जनता पार्टी आघाडी
6) श्री उमरेकर अशोक रावण, शिवसेना,भारतीय जनता पार्टी आघाडी
7) श्री नवाब गुरुमितसिंघ ब-यामसिंघ, शिवसेना,भारतीय जनता पार्टी आघाडी
8) श्री लतिफा बेगम बु-हाणखान,एम.आय.एम.

करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20(5) अन्वये नांवामनपाकेच्या स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या वरील सदस्यांच्या रिक्त (8) जागावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 31 अ नुसार नविन (8) सदस्यांची नामनिर्देशानाव्दारे नेमणूक करण्यासाठी प्रस्ताव सादर.

टिपः- शासन परिपत्रक क्र.संकिर्ण 2010/प्र.क्र.-85/नवि-32 दि.6 जूलै 2010 नुसार विरोधी पक्ष नेते,सभागृह नेते ,गट नेत्यामार्फत स्थायी समितीवर तौलनिक संख्याबळाच्या आधारावर पालिका सदस्याची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी नांवे पाठवितांना ती बंद लखोटयात सभेच्या वेळी महापौराकडे देण्यात यावीत.सभेच्या दिवसापुर्वी सदर नांवे महापौरांना बंद लखोटयात द्यावयाची असतील तर त्या पत्राची एक प्रत बंद लखोटयात , आयुक्तांना सुध्दा देण्यात यावी

**विषय क्र.3:-**

मा. उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. 156/2011व 133/2012 मध्ये दि.25.4.2014 रोजी दिलेल्या आदेशान्वये राज्यातील सर्व जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदावर अशासकीय सदसयांची नियुक्ती करुन शासकीय /अशासकीय सदस्यांची एकत्रित जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद गठित करण्यासाठी आदेशित केलेले असून त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, नांदेड यांनी पत्र क्र.2014/पुवि/प्रशा-3का/सिआर दि.6.9.2014 अन्वये जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर नियुक्तीकरण्यासाठी अशासकीय महिला खुला एक व खुला एक सदस्याचे नावाची शिफारस करण्यासाठी कळविलेले आहे त्यानुसार महिला खुला एक व खुला एक सदस्याचे नावाची शिफारस करणे बाबत.

**विषय क्र.4:-**

मा.आयुक्त (कु.क.) तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र ,मुबई याचे पत्र क्र.राआसे/एनयूएचएम/इनफो/26988/27255 दि.28 जूलै 2014 च्या पत्रानुसार राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान राबविण्यासाठी सन 2013.2014 च्या आराखडयास मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार दवाखान्यासाठी लागणारे वैद्यकिय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु न्यु कन्स्ट्रक्शन यूपीएचसी या शिर्षकात निधी प्राप्त झालेला नाही. फक्त रिपेयर /रिव्नोव्हेंशन/अपग्रेडेशन या शिर्षकामध्ये निधी मंजुर करण्यात आला आहे.करीता न्यु कन्स्ट्रक्शन साठीचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून अद्यापपर्यत त्यास मान्यता मिळाली नाही. करीता मनपा क्षेत्रातील झोपडपटी विभागातील नागरीकांना आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध्द करुन देण्यासाठी 1) विनायकनगर/खुशालसिंह नगर/2) श्रावस्तीनगर,3) कौठा व 4) तरोडा येथील चार ठिकाणी नविन युपीएचसी सुरु करावयाचे आहे. येथील चार ठिकाणी बाहयरुग्ण दवाखाने तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर घेवून दवाखाना कार्यान्वीत करण्यासाठी प्रस्ताव सादर.

**विषय क्र.5:-**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.मभवा-1114/प्र.क्र.12/सेवा-9 दि.20 सप्टेंबर 2014 नुसार का.आदेश क्र.नांवाशमनपा/लेवी/वेतन/12355/2014 अन्वये नावामनपाकेतील कर्मचा-यांना दि.1.5.2014 पासून 100 टक्के महागाई भत्ता लागू करण्यात आला त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**विषय क्र.6:-**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.निमवा-2013/प्र.क्र.77/सेवा-4दि.8 मे 2014 अन्वये नांवामनपाकेतील निवृत्ती वेतन/कु.नि.वेतनधारक याचे दि.1 ते 2014 पासून दरमहा 100 टक्के या दराने महा.भत्ता वाढ मंजुर करण्यात आलेला असल्यामूळे का.आ.क्र. क्र.नांवाशमनपा/लेवी/वेतन/12355/2014 अन्वये दि.1 जानेवारी 2014 ते 30 एप्रिल 2014 या कालावधीतील 100 टक्के यादराने महागाई भत्त्याची थकीत रक्कम देण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्त्र प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**विषय क्र.7:-**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.वाहभ-2014/प्र.क्र.5/सेवा-5दि.3 जून 2014 अन्वये सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनूसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना देय असलेल्या वाहतुक भत्याच्या दरात दि.1 एप्रिल 2014 पासून खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | ग्रेड वेतन | दरमहा वाहतुक भत्याचा दर (रु.) |
|---|---|---|
| 1 | रु.5400/- व त्याहून अधिक | रु.1200/- |
| 2 | रु.4400/- व त्याहून अधिक मात्र रु.5400/-पेक्षा कमी | रु.600/- |
| 3 | रु.4400/- पेक्षा कमी | रु.400/- |

तसेच अंध अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पिडीत असणा-या पात्र कर्मचा-यांना सुध्दा अनुज्ञेय असणा-या वाहतुक भत्यामध्ये पुढील प्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

| अ.क्र. | ग्रेड वेतन | दरमहा वाहतुक भत्याचा दर (रु.) |
|---|---|---|
| 1 | रु.5400/- व त्याहून अधिक | रु.2400/- |
| 2 | रु.4400/- व त्याहून अधिक मात्र रु.5400/-पेक्षा कमी | रु.2000/- |
| 3 | रु.4400/- पेक्षा कमी | रु.2000/- |

नांवामनपा आदेश क्र. नावाशमनपा/लेवि/वेतन/12354/2014 दि.24 सप्टेंबर 2014 अन्वये नादेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचा-यानाही माहे 2014 पासून उपरोक्त् प्रमाणे सुधारीत दराने वाहतूक भत्ता लागू करण्याची तसेच माहे एप्रिल 2014 ते जूलै 2014 पर्यतची वाहतूक भत्याची थकबाकीची रक्कम महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नुसार अदाई करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**विषय क्र.8:-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार नादेड वाघाळा शहर महानगरपालिकेत ,स्थानिक संस्था कर नियम 2010 अन्वये दि.1.4.2010 पासून स्थानिक संस्था कराची अमलबजावणी सुरु झालेली आहे. त्यानुसार व्यापारी प्रतिष्ठाणांनी त्याची वार्षिक विवरणपत्रे सन 2010-2011 ते सन 2013-2014 पर्यत स्थानिक सस्था कर विभागात सादर केलेली आहेत तसेच काही व्यापारी प्रतिष्ठाणांची विवरणपत्रे,नोटीस/जाहिर सुचना प्रसिध्दी देवून सुध्दा अप्राप्त असल्यामूळे स्थानिक संस्था कर विभागाच्या पथकाकडून मोठया प्रमाणात कार्यवाही होणार असून त्यांच्या परिणामाने मोठया प्रमाणात व्यापारी प्रतिष्ठानाचे विवरणपत्रे दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअनुषंगाने वरील प्रमाणे चार वर्षाचे कर निर्धारण ही विहित मुदतीत निकाली काढल्यास त्यामधून दंडासहीत स्थानिक संस्था कर मिळू शकतो.त्यामूळे स्थानिक संस्था कर विभागास पाच चार्टड अकौटंट मानधन तत्वावर दि.31.3.2015 पर्यत उपलब्द करुन घेतल्यास सदरील संचिका मध्ये कर निर्धारण करुन तात्काळ निकाली

काढता येतील. व त्यातून महानगरपालिकेस उत्पन्न पण होइल.

नांदेड शहरात सात हजार व्यापारी प्रतिष्ठाने असून त्याचे सन 2010-2011 ते सन 2013-2014 या कालावधीच्या अंदाजे दहा हजार संचिकामध्ये कर निर्धारण करणे शिल्लक आहे व नियमातील तरतूदीनूसार संबंधित कर निर्धारण वर्षाच्या अंतिमपासून पाच वर्षाच्या आंत कर निर्धारण करणे आवश्यक आहे. तसेच सदर चार्टड अकौंटंट ,सगणक चालक व काही अधिकारी सवंर्गातील कर्मचारी यांची नेमणूक व त्यासाठी लागणारी कागदपत्रे (स्टेशनरी ) खरेदी करण्याचे अधिकार आयुक्त यांना देण्यात यावेत. त्यामूळे स्थानिक संस्था कर विभागास वरील प्रमाणे कर्मचारी वर्ग दि.31.3.2015 पर्यत मानधन तत्वावर घेण्याकरीता तसेच आवश्यकते नुसार त्यांना मुदतवाढ देण्याचे अधिकार आयुक्तांना देणे बाबतचा प्रस्ताव येणा-या सर्वसाधरण सभेसमोर सादर

**विषय क्र.9:-**

नांवामनपा केने सन 2014.2015 करीता मे.मयुर इंटरप्रायेजेस मालेगांव नाशिक यांची पारगमन शुल्क वसुलीकरीता अभिकर्ता म्हणून नियुक्ती केली होती. त्यांची रु.6,30,00,000 (अक्षरी रु.सहा कोटी तीस लक्षफक्त) एवढया रक्कमेवर दि.3.5.2014 ते दि.2.5.2015 या कालावधीसाठी मूळ निविदेतील सर्व अटी व शर्तीस अधिन राहून अभिकर्ता म्हणून नेमणूक केली होती त्याचेकडून आर्थिक देकार रक्कमेच्या 10 टक्के होणारी रक्कम रु.63,00,000 (अक्षरी रु.त्रेसष्ब्ट लक्ष फक्त) ची बॅक गॅरंटी घेण्यात आलेली आहे. तसेच त्यांनी देकार रक्कम रु.26,25,000(अक्षरी रु.सव्वीस लक्ष पंचविस हजार फक्त) 24 पंधरवाडयात भरावयाची होती.त्यापैकी त्यांचनी आतापर्यत सहा हप्त्याची रक्कम रु.1,57,50,000 ('अक्षरी रु.एक कोटी सत्तावन्न लक्ष पंनन्नास हजार फक्त) चा भरणा केलेला आहे.

तथापी शासन निर्णय क्र.स्थासंक2014/प्र.क्र.121/नवि-32 नगरविकास ,मंत्रालय,मुबई 32 दि.13.8.2014 च्या पत्रान्वये ऐवजी स्थानिक संस्था कर लागू आहे त्या ठिकाणी पारगमन शुल्क आकारणे योग्य नाही आपल्याकडील पारगमन शुल्कापासूनची वसुली किरकोळ स्वरुपाची असल्यामूळै हे पारगमन नाके तात्काळ बंद करण्याची कार्यवाही दि.16.8.2014 पासून करावी. शासनस्तरावरील निर्देशामूळे नांवाशमनपाकेस कोणतेही अनुदान देण्याबाबतचे सुचित केलेले नाही. त्यामूळे सदर नुकसान पोटीची रक्कम शासनस्तरावरुन मागणी करणे योग्य राहील.

**विषय क्र.10:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालकीचे 13 व्यापारी संकुल असुन त्यामधील 527 दुकाने भाडेपट्टयावर देण्यात आलेली आहेत. तसेच महानगपालिकेच्या मालकीच्या विविध ठिकाणच्या जागा भाडेपट्टयावर देण्यात आलेले आहेत. सदरील जमीन भाडेकरुंची संख्या 163 आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 अन्वये महानगरपालिकेच्या मालमत्तेचा विनीयोग करण्या संबधित तरतुद आहे. त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे रिकामी जागा व व्यापारी संकुलामधील दुकाने/गाळे/ ओटे, भविष्यात महानगरपालिकेचे नविन व्यापारी संकुल बांधण्यात येणाऱ्या व्यापारी संकुलामघील दुकाने /गाळे/ओटे,स्थानीक वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करुन जाहीर लिलाव/ निवीदे द्वारे भाडेपट्टीवर देण्यासाठी खालील नियम व अटी प्रमाणे देणेसाठी सादर

**मालमत्तेचे विनीयोग करीत असतांना भोगवटदारास मालमत्ता भाडेपट्टयावर देत असतांना द्यावयाचे**

**<u>सर्वसाधारण अटी व नियम</u>**

**1) लिलावाची पध्दत:-**

1) महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही इमारत,गाळा, मोकळी जागा यांचा भागवटा अधिकार भाडेपट्टीने देण्यासाठी त्या बाबत दैनिक वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देण्यात येईल.

2) महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही इमारत,गाळा, मोकळी जागा भागवटया अधिकार भाडेपट्टीने देण्यासाठी जाहीर लिलाव अथवा बंद लखोटयात इच्छुकांडुन निवीदा मागवुन देण्यात येईल. वरील पैकी जागेची व्यावसायीक उपयोगीता सार्वजनिक सुविधा इत्यादी एखादी मालमत्ता भाडेपट्टीवर देण्याची आहे हे आयुक्त महानगरपालिका वेळोवेळी ठरवितील.

3) लिलावात नमुद अनामत किंवा भाडे रक्कम यापैकी जास्तीत जास्त रक्कम देणाऱ्यास किंवा इतर पध्दतीने गाळा /जागा भाडेपटयावर देण्याची कार्यवाही करण्याचा अधिकार आयुक्त महानगरपालिका यांना राहील.

4) 3 पेक्षा कमी लिलावधारक / निवीदा प्राप्त झाल्यास, किंवा लिलावात/ निवीदेत योग्य रक्कम न मिळाल्यास किंवा प्रशासकिय कारणाने कोणताही लिलावात बदल अथवा रद्द करण्याचा अधिकार, आयुक्त महानगरपालिका यांना राहील.

**2) लिलावात भाग घेण्याची पात्रता :-**

1) लिलावात/निवीदेत भाग घेण्यासाठी धारकाचे वय 18 वर्षा पुर्ण असावे.

2) लिलावात/निवीदेत भाग घेण्यासाठी धारक हा शासकीय अथवा निमशासकिय संस्थेमध्ये नौकरीस नसला पाहीजे. तसेच महानगरपि ालका कर्मचारी लाभधारक असता कामा नये.

3) लिलावात/निवीदेत भाग घेण्यासाठी धारक हा नियमानुसार गाळयास देण्यात येणाऱ्या आरक्षणास पात्र असला पाहीजे. व त्याबाबतचे कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहील.

4) धर्मदाय संस्था असल्यास वरील अटी शिथील असेल.

5) लिलावात/निवीदेत भाग घेण्यासाठी व्यवसायीकाने पॅन कार्ड, मतदान कार्ड, व आधार कार्ड ची छायांकित प्रत द्यावी लागेल. तसेच धारकानी स्थानिक प्राधिकाराकडुन मालमत्ता कर व महाराष्ट्र शासनाचे कर जसे शिक्षणकर, रोजगार हमी योजना कर, अकृषिक कर अथवा इतर कराची थकबाकी नसावी.

6) तसेच वरील पैकी भाडेपट्टीवर देण्यात येणाऱ्या ज्या जागा अपंग, जाती प्रवर्ग जसे (अनुसुचित जाती/जमाती) इ. व सेवाभावी संस्था, महिला बचत गट किंवा इतर साठी आरक्षीत असल्यास त्या बाबतचा पुरावा सादर करावा लागेल.

**3) गाळयाचे आरक्षण :-**

1) खुला प्रवर्ग व महिला, अनुसुचित जाती व जमाती व इतर मागासर्गीस, विमुक्त जाती व जमाती यांना नियमानुसार जात प्रवर्ग आरक्षणाचा लाभ घेवुन आरक्षीत गाळे घेता येईल. तसचे वरील प्रवर्गातील ज्या व्यक्तींना शासनाच्या तत्सम योजनेखाली कोणतेही अनुदान प्राप्त न झाल्याचे समक्ष प्राधिकाऱ्याचें प्रमाणपत्र असणाऱ्या व्यक्तींना गाळे भाडेपट्टयावर देण्यात येईल.

2) महानगरपालिका व्यापारी संकुलामध्ये महाराष्ट्र शासन परिपत्रका नुसार महिला, व शौक्षणिक व सामाजिक संस्था यांना आरक्षणा व नियमनुसार भाडेपट्टयवर देण्याचे अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड यांचा राहील.

3) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण, आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम 1995 हा केंद्रशासनाचा कायदा सन 1996 पासुन अंमलात आला या कायद्यातील तदतुदी दि.07.02.1996 पासुन महाराष्ट्र शासनास लागु झाला सदर अधिनियमातील 43 मधील अपंग व्यक्तींना सवलतीच्या दाराने दुकान/गाळा देण्याची तरतुद आहे.

4) ज्या व्यक्ती अपंग आहेत व ज्यांना शासकीय धोरणाखाली कोणत्याही लाभ देण्यात आलेला नाही, असे शासनाचे समाजकल्यण विभागाने प्रमाणपत्र दिलेल्या व्यक्ती गाळा भाडेपट्टीवर देता येईल.

5) अपंग व्यकतींना माकळी जागा ही 1 ते 3 वर्षापर्यंत भाडेपट्टयावर देण्याचा अधिकार आयुक्त नांदेड महानगरपालिका यांना राहील .तसेच 3 वर्षापेक्षा पेक्षा जास्त कालावधीसाठी भाडेपट्टयावर द्यावयाची झाल्यास महानगरपालिकेची सर्व साधारण सभेची मान्यता असली पाहीजे

6) व्यापारी संकुलातील दुकाने हे 1 ते 30 वर्षापर्यंत भाडेपट्टयवर देण्याचा अधिकार आयुक्त नांदेड महानगरपालिका यांना राहील .तसेच 30 वर्षापेक्षा पेक्षा जास्त कालावधीसाठी भाडेपट्टयावर द्यावयाची झाल्यास महानगरपालिकेची सर्व साधारण सभेची मान्यता असली पाहीजे

7) शहर विकासकामात ज्यांची मालमत्ता बाधित झाली आहे परंतु त्यांनी आजपर्यंत कोणत्याही प्रकारचा मावेजा घेतेलेला नाही अशांसाठी 5% दुकाने आरक्षीत राहील.(शासन निर्णया प्रमाणे)

8) दुकान अथवा मोकळी जागा भाडेपट्टीवर देण्यात येतांना नियमाप्रमाणे जाती प्रवर्ग जसे (खुला/इमाव/अनुसुचित जाती/जमाती अशा इतर) व सेवाभावी संस्था, महिला बचत गट इ.साठी आरक्षीत असेल.

**4) भाडेपटयाचा कालावधी :-**

1) महानगरपालिकेची मालमत्ता 1 महिना ते 30 वर्षासाठी भाडेपट्टीवर देण्यात येईल.

2) मोकळया जागच्या बाबतीत 3 वर्षा पर्यंत आतील कालावधी निश्चीत करण्याचा अधिकार आयुक्त नांदेड महानगरपालिका यांना असेल परंतु 3 वर्षा पेक्षा जास्त कालावधीसाठी मोकळी जागा भाडेपट्टयाने द्यावयाची असल्यास त्यास महानरगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक राहील. व्यापारी संकुलातील गाळा, भाडेपट्टीचा कालावधी, ्ज्या जागेची उपयोगीत, भविष्यातील गरज इत्यादी बाबी विचार घेवुन 30 वर्षाच्या मर्यादेत आयुक्त नांदेड महानगरपालिका यांनी वेळोवेळी निश्चीत करतील.

4) जाहीर लिलावात/निवीदेमध्ये दुकान /गाळा भाडेपटयावर देण्याचे अंतिम झाल्यानंतर भाडेपट्टा करुन दिल्यानंतरच दुकान /गाळा ताब्यात देण्यात येईल. व वेळोवेळी महानगरपालिका जी मुदतवाढ देईल ती मुदतवाढ भाडेकरुस मान्य असेल.

**5) भाडे निश्चीतीची पध्दत व अनामत रक्कम :-**

1) व्यापारी संकुलातील दूकानाचे भाडे व अनामत सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका नांदेड हे चालु बाजार भावाने ठरवितील त्या प्रमाणे राहील. निवीदा /लिलावाची बोली भाडे किंवा अनामत बाबत राहील. अनामतची रक्कम परतावा व बिनव्याजी राहील. तसेच भाडेवाढ प्रतिवर्ष 10% राहील.

2) सदर भाडेपट्टाचा करारनामा चार भिंतीच्या आतील व छताखालील जागेबद्दलची राहील. व बाहेरील जागेबद्दल नाही त्यावर भाडेपट्टाधारकाचा हक्क राहणार नाही.

3) दुकानाचे भाडे महिन्याला म्हणजे कॅलेन्डर महिन्याप्रमाणे राहील. दर महिन्याचे भाडे त्याच महिण्याच्या 1 ते 5 (एक ते पाच) तारखेस अगावु On-line पध्दतीने जमा करुन पावती घ्यावी लागेल. दुकानाचे दरमहा भाडे थकीत ठेवल्यास त्यावर 2% व्याज आकारण्यात येईल. तसेच भाडे स्वत: येऊून महानगरपालिकेचे मालमत्ता विभागात भरावे लागेल अथवा online भरावे लागेल. जर दोन महिण्यापेक्षा जास्त भाडे थकीत राहील्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81-ब मधील तरतुदी नुसार दुकानातुन काढुन टाकण्याचा अधिकार आयुक्त नांदेड महानगरपालिका यांना राहील.

4) तसेच वेळोवेळी सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका नांदेड हे ठरवितीत ते भाडे रक्कम बदल करण्याचा अधिकार आयुक्त महानगरपालिका यांना राहील. (उदा.शिर्घसिध्द गणना तथा चालु बाजार बाजार भावाप्रमाणे बदल.)

**6) जागेचा वापर :-**

1) करारनाम्यात लिहून दिल्याप्रमाणे दुकानात व्यवसाय करावा लागेल व या शिवाय इतर व्यवसायासाठी वापरता येणार नाही. तसेच व्यवसायात बदल करावयाचे असल्यास 30 दिवसाचे आत महानगरपालिकेची वेगळी परवानगी घ्यावी लागेल

2) मांस विक्रीसाठी भाडेपटयावर देण्यात आलेल्या गाळयास सोडुन इतर व्यापारी संकुलातील दुकान /गाळे मध्ये पेट्रोल, घासलेट, गंधक व इतर स्फोटक किंवा ज्वालागृही वस्तु, मांस दुकानात ठेवता येणार नाही व विक्री करता येणार नाही.

3) दुकानाच्या जागेत अथवा त्याच्या कोणत्याही भागावर पोटभाडेकरु ठेवण्याचा किंवा कोणत्याही प्रकारे दुसऱ्याला कब्जा करुन देण्याचा अधिकार भाडेकरुस राहणार नाही. तसेच भागीदारी ठेवता येणार नाही तसे आढळुन आल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81-ब मधील तरतुदी नुसार दुकानातुन काढुन टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**7) भाडेपट्टी संपुष्टात येणे :-**

1) दुकानाचे भाडे महिन्याला म्हणजे कॅलेन्डर महिन्याप्रमाणे राहील. दर महिन्याचे भाडे त्याच महिण्याच्या 1 ते 5 (एक ते पाच) तारखेस अगावु जमा करुन पावती घ्यावी लागेल. दुकानाचे दरमहा भाडे थकीत ठेवल्यास त्यावर 2%

व्याज आकारण्यात येईल. तसेच भाडे स्वतः येऊून महानगरपालिकेचे मालमत्ता विभागात भरावे लागेल अथवा online भरावे लागेल.जर दोन महिण्यापेक्षा जास्त भाडे थकीत राहील्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81-ब मधील तरतुदी नुसार दुकानातुन काढुन टाकण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील.

2) जे भाडेकरु 2 महिण्यपेक्षा जास्त भाडे जास्त थकीत ठेवतील, जो भाडेकरु महानपालिकेची विनापरवाना इमारतीत बांधकाम किवां तोडफोड किवां बदल करेल अशा भाडेकरुंचा भाडेपट्टा रद्द करण्यात येईल. व त्यांनी जमा केलेली अनामत रक्कम सुध्द जप्त करण्यात येईल.

3) तसेच भाडेकरारपत्रातील कोणत्याही अटी शर्तीचे उलंघन केल्यास केल्यास व वेळोवेळी प्राधिकारणाचे सुचना/आदेशाचे पालन न केल्यास भाडेपट्टा संपुष्टात येईल.

**8) स्वखुशीने भाडेपट्टा रद्द करणे बाबत**

1) भाडेपट्टा धारकास या दुकानाची आवश्यकता नसल्यास त्यांनी एकमेकास किमान एक महिणा अगोदर महानगर पालिकेत अर्ज करणे आवश्यक राहील.

2) थकलेले भाडे दिल्याशिवाय जागेतून सामान हलविता येणार नाही व त्यावर महानगरपालिकेचा ताबा राहील.

3) लाईट व नळाचे बील पुर्ण व वेळेवर भरण्याची जबाबदारी भाडेपट्टाधारकाची ( माझी ) राहील. व ते न भरल्यास महानगरपालिकेचे जे नुकसान होईल ते भाडेपट्टाधारकाकडून वसुल करण्याचा महानगरपालिकेस हक्क राहील.

4) आपल्या जागेत कोणतेही बांधकाम किंवा तोडफोड करणार नाही व जागा सोडतांना लाईट फिटींग व नळ फिटींग आज ज्या परिस्थीतीत घेतली त्याच परिस्थितीत असल्याची खात्री करुन देईन. व त्यानंतरच ठेवण्यात आलेली अनामत रक्कम परत दिली जाईल.

**9) भाडेपट्टीचे हस्तांतरण :-**

भाडेपट्टीचे नांव परिवर्ततन करावयाचे असल्यास त्याची फिस त्या वेळीच्या चालु बाजार भावाच्या (रेडीरेकनर किंमतीच्या) 25% राहील.

**10) वारसा हक्का अधारे भाडेपट्टा हस्तांतरण :-**

1) भोगवटयाचा मुळ भाडेकरु मृत्यु पावल्यास त्यांच्या इतर वारसास इमारतीच्या बाजारभाव मूल्यांकनाच्या च्या 10% रक्कम फिस भरुन भाडेपट्टा हस्तांतरण करता येईल.

2) भोगवटयाचा मूळ भाडेकरु मृत्यु पावल्यास त्यांच्या पत्नीने भाडेपट्टा हस्तांतरणाचा विनंती अर्ज केल्यास इमारतीच्या बाजारभाव मूल्यांकनाच्या च्या 5% रक्कम फिस भरुन भाडेपट्टा हस्तांतरण करता येईल. परंतु मृताच्या पत्नीने 60 दिवसाचे आत भाडेपट्टा हस्तांतरणाचा विनंती अर्ज केला पाहीजे.

तसेच सदर बाबीमध्ये अर्ज करण्यास विलंब झाल्यास पुढील निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त नांदेड महानगरपालिका यांना राहील.

3) भोगवटयाचा मुळ भाडेकरु हयात असेल व त्यांना भाडेपट्टा हस्तांतरण करावाचे असल्यास इमारतीच्या बाजारभाव मूल्यांकनाच्या च्या 10% रक्कम फिस भरुन भाडेपट्टा हस्तांतरण करता येईल.

**11) इमारतीची तपासणी :-**

वेळोवेळी महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी यांना इमारत पहाणी व तपासणीसाठी अधिकार असेल.

**12) विना परवानगी जागेत/ इमारतीच्या संरचनेत बदल करणे :-**

1) दुकाने भाडयाने घेतल्या नंतर महानगरपालिके तर्फे नाहरकत प्रमाणपत्र घेवुन स्वखर्चाने रितसर विजेची जोडणी करुन घ्यावी लागेल, व विजेचे बिल ज्याचे त्यानी भरावयाचे आहे. लाईट व नळाचे बिल पुर्ण व वेळेवर भरण्याची जबाबदारी भाडेपट्टाधारकाची राहील. ते न भरल्यास महानगरपालिकेचे जे नुकसान होईल ते भाडेपट्टाधारकाकडुन वसुल करण्यात येईल.

2) दुकानाच्या जागेत कोणतेही आगावु बांधकाम अगर बदल महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. तसेच मोडतोड केल्यास किंवा झाल्यास, त्या बद्दलचा खर्च भाडेकरुंकडुन वसुल करता येईल. तसेच या कारणासाठी भाडेपट्टा रद्द करुन दुकान ताब्यात घेण्याचा हक्क आयुक्त नांदेड महानगरपालिका यांना राहील.

**13) विविक्षीत व्यवसायांना प्रतिबंध**

1) मांस विक्रीसाठी भाडेपटयावर देण्यात आलेल्या गाळयास सोडुन इतर व्यापारी संकुलातील दुकान /गाळे मध्ये पेट्रोल, घासलेट, गंधक व इतर स्फोटक किंवा ज्वालागृही वस्तु, मांस दुकानात ठेवणार नाही व विक्री करणार नाही.

**14) भाडेकरुंचे कर्तव्य :-**

1) भाडेकरुंने भाडयाची जागा नीटनेटकी व स्वच्छ ठेवावा व स्वखर्चाने चुना किंवा रंग लावावा लागेल.

2) भाडेपट्टाधारक हे भाडयाने घेतेलेली दुकान कोणत्याही कारणामुळे 1 महिण्या पेक्षा जास्त दिवस बंद ठेवणार नाही.

3) भाडेपट्टाधारकाकडुन आजुबाजुच्या भाडेकरुंना/ शेजाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही.

4) भाडेपट्टाधारकास दुकानावर जाहीरात बोर्ड लावता येणार नाही.

5) भाडेपट्टयाची मुदत संपल्यानंतर भाडेपट्टीची मुदत वाढवुन देणे मनपास बंधनकारक राहणार नाही. भाडेपटयाची मुदत संपण्या पुर्वीच महानगरपालिकेस या दुकानाची आवश्यकता भासल्यास एक महिणा अगोदर कळविल्यास दुकान रिकामे करून द्यावे लागेल. व या बाबत कोणत्याही न्यायालयात किंवा इतर ठिकाणी दावा / दाद मागता येणार नाही. दुकाना बद्यल इतरत्र ठिकाणी (बदली) दुकान / जागा मागता येणार नाही.

6) भाडयाने घेतलेले दुकान कोणत्याही अपत्तीमुळे आगीमुळे नष्ट झाली, पुरामुळे नुकसान पावली व धरणी भूकंपामुळे नष्ट अथवा खराब झाल्यास त्याच्या मोबदल्यात भाडेपट्टाधारकास काहीही वाटा किंवा हिस्सा राहणार नाही व फक्त वाटा हिस्सा महापालिकेचा राहील.

7) वेळोवेळी महानगरपालिकेने दिलेल्या आदेशाचे पालन करावे लागेल

8) महानगरपालिकेची एखादी मालमत्ताएखाद्या संस्थेस/ व्यक्तीस भाडेकरारने भाडेपट्टयावर दिले असता अशी मालमत्ता संबंधित संस्थेने/ व्यक्तीने महानगरपालिका आयुक्त यांचे मान्यतेशिवायय गहाण ठेवणे, पोट-भाडयाने अथवा अन्यरितीने अन्य संस्थेस/व्यक्तीस हस्तांतरित करणे अनुज्ञेय रहणार नाही.

9) करारनाम्यातील कोणत्याही अटी शर्तीचे कोणत्याही वेळी/ स्थीतीत भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेले.

10) संबधित भाडेकरुस संबधित व्यवसाय करण्यासाठी सक्षम प्राधिकारणाकडे नोंदणी आवश्यक आहे. उदा.स्थानिक संस्थाकर, धर्मदाय आयुक्त,वजन काटे मापन कार्यालय, मनपा व्यवसाय परवाना इ.

**15) महानगरपालिकेचे अधिकार :-**

वरील प्रमाणे कोणत्याही नियम व अटीचे उलंघन केल्याचे आढळुन आल्यास महानगरपालिकेकडून दुकानाचा ताबा परत घेण्यात येईल.

निविदा/ लिलाव प्रक्रियेत व नियम व अटी मध्ये शिथीलता, दुरुस्ती / बदल करण्याचा अधिकार आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड यांचा राहील. व तो निर्णय अंतिम राहील.

**वरील नियमात उल्लेखित अन्य सर्व संज्ञा/व्याख्या या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय 1949 मध्ये नमुद केल्याप्रमाणे असती.**

**विषय क्र.11:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे जनता मार्केट शिवाजी नगर हे जुने झाल्यामुळे व त्याच्या सक्षमते बाबत स्ट्रक्चरल ऑडीट अहवालान्वये सदरील मार्केटची इमारत धोकादायक झाली आहे.

तरी सदरील मार्केट पाडुन, नव्याने बांधकाम करण्यासाठी येथील भाडेकरुंना गाळा रिकामा करुन महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 81 ब (1) अन्वये आदेशित करण्यात आले आहे. सदरील आदेशा विरुध्द काही भाडेकरुंनी प्रकरण न्यायप्रविष्ट केले आहे व या बाबतीत भाडेकरुंची बेठक बोलवण्यात आली असता काही भाडेकरुंनी याबाबत करारनामा करुन देण्याची विनंती केली आहे. त्यामुळे सदरील मार्केट मधील भाडेकरुंना करुन देण्यात येणारे करारनाम्याचे प्रारुप सादर.

**<u>करारनामा</u>**

| | | |
|---|---|---|
| आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड<br>यांच्या वतीने श्री ---------------------------------------<br>वय वर्ष धंदा-नौकरी, मालमत्ता व्यवस्थापक,<br>नां.वा.श.म.न.पा.,नांदेड यांना देण्यात आलेला अधिकार<br>पत्र क्र.जवमा/118/2008 दि. 16/5 /2008 ई. आधारे. | } | **लिहुन घेणार** |
| | | |
| श्री -----------------------------------------<br>वय व्यवसाय रा.<br><br>दु.क्र. जनता मार्केट शिवाजी नगर नांदेड | } | **लिहून देणार** |

आज दि. / /2014 रोजी करारनामा लिहून देण्यात येतो की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे जनता मार्केट शिवाजी नगर नांदेड हे जुने झाल्यामुळे व त्याच्या सक्षमते बाबत स्ट्रक्चरल अहवालांन्वये मी सदरील मार्केटची इमारत धोकादायक झाली आहे. तसेच सदरील मार्केट मधील मी दु.क्र.------- चा भाडेकरु असल्यामुळे खालील नियम व अटीवर हें दुकान रिकामे करुन महानगरपालिकेच्या ताब्यात देत आहे.

**<u>नियम व अटी</u>**

1) सदरील मार्केटचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्यातील दुकान/गाळा माझ्या आजच्या ताब्यातील दुकान/गाळा मोबदल्यात मला (भाडेकरुस) भाडेपट्टयाने देण्यात येईल.

2) सदरील दुकानाच्या बांधकामा करीता प्रति चौ. मीटर जो खर्च येईल त्या खर्चाच्या रक्कमे पैकी करारनामा करते वेळी रु.1 लक्ष रक्कम द्यावी लागेल. तसेच उर्वरित रक्कम समान चार हस्यात द्यावी लागेल. त्या पैकी प्रथम हस्याची 25% रक्कम करारनामा झाल्याच्या तारखेपासून एक महिण्याच्या आत द्यावी लागेल. दुसऱ्या हस्याची 25% रक्कम 3 महिण्याच्या आत द्यावी लागेल. तिसऱ्या हस्याची 25% रक्कम 6 महिण्याचे आत द्यावी लागेल. तसेच उर्वरीत चौथ्या 25% रक्कम दुकान/ गाळयाचा ताबा घेण्यापुर्वी जमा करावी लागेल. त्याच प्रमाणे पुर्वीचे दुकानाचे भाडे मालमत्ता कर व इतर कराचा पुर्णपणे भरणा केल्यानंरच दुकानाचा ताबा मला देण्यात येईल.

3) वरीलप्रमाणे जी रक्कम ठरविण्यात आलेली आहे त्याप्रमाणे वेळेवर सदर रक्कम न भरल्यास सदर गाळा मिळण्यास मला अपात्र ठरविण्यात येईल. हे मला मान्य आहे.

4) बांधकाम पुर्ण होवुन ताबा मिळेपर्यंत व्यवसाय करण्यास नांदेड महानगरपालिका जी पर्यायी व्यवस्था करेल त्यास मी राजी खुशीने तयार आहे.

5) गाळा/हॉल ज्या व्यवसायासाठी भाडयाने घेतली त्या कामाशिवाय इतर व्यवसायासाठी वापरणार नाही.

6) नव्याने देण्यात येणाऱ्या गाळा/हॉल चे भाडे सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका नांदेड किंवा आयुक्त महानगरपालिका, नांदेड हे ठरवितील ते मी देण्यास तयार आहे.

7) दर महिन्याचे भाडे त्याच महिण्याच्या 1 ते 5 (एक ते पाच) तारखेस अगावु जमा करुन रसीद घेण्यात येईल. अन्यथा दरमहा 2% व्याज भरण्यास मी पात्र असेल.

8) भाडेकरुंचे ज्या मजल्यावर दुकान होते त्याच मजल्यावरील गाळा/हॉल अनुक्रमांकानुसार देण्यात येईल.

9)दुकानाच्या बांधकामास आलेल्या प्रति चौ.मिटर खर्चाची रक्कम नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेकडे परतावा बिनव्याजी म्हणून जमा असेल. जर दुकान सोडावयाचे असल्यास सदर रक्कम महानगरपालिकेडून परत मिळेल. या व्यतिरीक्त गाळेधारकांकडुन गाळयाच्या या करारनाम्याच्या वेळेच्या शिर्घसिध्दगणक दरानुसार येणाऱ्या किंमतीच्या 50% रक्कम नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेकडे अनामत रक्कम बिनव्याजी जमा असेल. जर दुकान सोडावयाचे असल्यास सदर अनामत बिनव्याजी महापालिकेडुन परत मिळेल.

10) सदर दुकानाचा भाडेपट्टा हस्तांतरण करवयाचा असल्यास प्रचलित (चालु) शिघ्रसिध्दगणक दरानुसार येणाऱ्या किंमतीच्या 25% रक्कम भाडेपट्टा हस्तांतरण करण्यापुर्वी महानगरपालिकेस भरणा करावा लागेल त्यानंतरच भाडेपट्टा दुकान हस्तांतरणास परवानगी देण्यात येईल. भाडेपट्टा हस्तांतरण हे फक्त उर्वरित कालावधीसाठीच करता येईल. महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय भाडेपट्टा हस्तांतरण करता येणार नाही.

11) भाडेपट्टा हस्तांतरण करते वेळेस मुद्दा क्र.9 मध्ये नमुद जमा केलेल्या सर्व रकमा जप्त करणेत येतील त्या परत मिळणार नाहीत.

12) करारनाम्यातील कोणत्याही अटी किंवा शर्तीचा भंग झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81-ब मधील तरतुदीनुसार दुकानातुन काढुन टाकण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील.

13) शासन निर्णयानुसार किंवा महानगरपालिकेचे अधिकारानुसार अटी/ शर्ती मध्येबदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका नांदेड यांना असेल.

14) सदर शॉपींग कॉम्पलेक्सचे काम पुर्ण झाल्यानंतर गाळा/हॉल ताबा देताना गाळा/हॉल वापर, भाडेपट्टेचा कालावधी, भाडे रक्कम, दुकान हस्तांतरण करावयाच्या तरतुदी इ.च्या अनुषंगाने वेगळा करारनामा करुन देण्यात येईल.

सबब हे भाडेपत्र मी आपले स्वसंतोषाने व राजीखुशीने लिहुन दिले व लिहुन घेतले ते सही फक्त आज दिनांक रोजी

| **दिनांक :-**<br>**साक्षीदार :-** | **लिहुन देणार** |
|---|---|
| 1) | श्री ----------------------------------------<br>वय व्यवसाय रा.<br>दु.क्र. जनता मार्केट शिवाजी नगर नांदेड |
| 2) | **लिहुन घेणार**<br>आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड<br>यांच्या वतीने श्री --------------------------------<br>वय वर्ष धंदा-नौकरी, मालमत्ता व्यवस्थापक,<br>नां.वा.श.म.न.पा.,नांदेड यांना देण्यात आलेला अधिकार पत्र क्र.जवमा/118/2008 दि. 16/5 /2008 ई. आधारे. |

तरी वरील प्रमाणे करारनाम्याचा प्रारुप सर्व साधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर

**विषय क्र.12**

नादेड शहरासाठी मंजूर असलेली विकास योजना (सुधारीत) आराखडयामध्ये सेक्टर –एफ मध्ये आरक्षण क्र.एफ-24 हिस्टोरिकल गार्डनसाठी आरक्षण प्रस्तावित केले असून त्याचे क्षेत्रफळ विकास योजना अहवालानूसार 8.93 हेक्टर आहे. सदर आरक्षणाचे विकासासाठी गुरुव्दारा बोर्ड नांदेड हे समुचित प्राधिकारण आहे. या ठिकाणी गुरुव्दारा बोर्डाकडून जागेचा विकास झालेला असून जागेस संरक्षित भिंत बांधून हिस्टोरिक गार्डनचा विकास केलेला नाही. तथापी जागा मालक श्री टहेलसिंघ गुरुमुखसिंघ निर्मले व स.हरमितसिंघ अर्जूनसिंघ निर्मले सिटीएस क्र.2163 पैकी रस्त्यासाठी 299.50 मि.संमतीने घेवून त्यांची उर्वरीत जागा आरक्षणातून वगळण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभा ठराव क्र.144 दि.15.3.2012 अन्वये संमती दिल्यावरुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये मुलभूत स्वरुपाची कार्यवाही करण्यात येवून सर्वसाधारणसभा ठराव क्र.144 दि.15.3.2012 अन्वये अंतिम मंजुरीनुसार शासनाकडे श्री निर्मले यांची जागा आरक्षणातून वगळून ही रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठीचा अंतिम मंजुरीचा प्रस्ताव महानगरपालिकेकडून शासनास पत्र दि.30.4.2014 अन्वये सदर प्रकरणात गुरुव्दारा बोर्डाने त्यांच्या हध्दीतील आरक्षण क्र.एफ -24 हिस्टोरिकल गार्डनच्या जागेस

कुपणभिंत घातली आहे. त्यामूळे सदर आरक्षण  मधून वगळावयाच्या कुपण भिंतीच्या बाहेरील संपूर्ण क्षेत्राचा एकच फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करणे उचित ठरेल.अशा प्रकारे तुकडया तुकडयाने फेरबदल प्रस्ताव सादर करण्यात येवू नये असे निर्देश दिलेले आहे. त्यानुसार कुपण भिंत बाहेरील आरक्षरणातील त्रिकोणी आकाराचे प्रस्तावात गावठाण सदृष्य भाग सुमारे 5102.35 चौ.मी.आरक्षण क्र.एफ 24 हिस्टोरिकल गार्डन मधून वगळून रहिवास विभागात समाविष्ठ करणेसाठी म.प्रा.नि.व न.र. अधिनियम 1966 चेकलम 37(1) नूसार फेरबदलाची वैधानिक कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव सादर.

**विषय क्र.13:-** **प्रस्ताव**

नांवामनपा हध्दीती एनटीसी मिल चा परिसर  व खडकपुरा भागात केंद्र शासनाकडून घरकुलची योजना मंजुरी झाली होती सदरील योजनेतून धरकुलासहित नागरी सुविधा देखील मंजुर झाल्याने  या भागातील नागरीक व लोकप्रतिनिधी आजना उद्या नारगी सुविधा उपलब्ध्द होईल या आशेने दिवस काढत होते .नांदेड शहराचा अनेक योजनांचे माध्यमातून विकास झाला पण दूर्देवाने सदरील  भाग विकासापासून वंचिंत आहे.उदा.ड्रेनेल लाईन,दिवाबत्ती,पिण्याचे पाणी,पक्के रस्ते, ई.मुलभुत सुविधा सदरील भाग विकासापासून वंचित राहून नये म्हणून जेएनएनयुआरएम किंवा एखाद्या राज्य शासनाच्या  योजनेत हा भाग समाविष्ट करुन मुलभूत सुविधासाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचकः- गफार खान गुलाम महमंद खान** **अनुमोदकः -गिल सरजितसिंघ**

**विषय क्र.14:-** **प्रस्ताव**

साईट क्र.34 येथे गोरक्षण हमालपुरा येथील रेल्वे लाईनला लागून असलेले कुटूंबाचे पुनर्वसन केले आहे त्यापैकी खालील प्रमाणे राहिलेले गरीब लोक साईट क्र.34 येथील बाजूला झोपडे टाकून राहत असून ते अत्यंत गरीब लोक असून महाराष्ट्रात

कोठेही त्यांना मालकीची घर नाही  सदरील हे सर्व नागरीक माझे मतदार असून हे माझे वार्डातील नागरीक आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1) मिराबाई कृष्णा मारावार | 2) दुर्गा विनोद जडीले | 3) साबेरा बेगम |
| 4) सुनिता विनोद झकारे | 5) फरीदाबेगम शेख नजिर | 6) अफसरीबेगम वजिर खान |
| 7) नाजमा शेख अशफाक | 8) हबीबा बी | 9) राधेशाम गगन चौधरी |
| 10) राजू नवनपवरे | 11) बालराज साईलू | 12) सकीना शेख सादिक |

त्यांना साईट क्र.34 येथे घरे देण्यासाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करण्यात येते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः- कमलाबाई रामस्वामी मुदिराज** **अनुमोदकः - श्रीनिवास सातेलीकर**

**विषय क्र.15:-** **प्रस्ताव**

नांवामनपा हदीत दुलेह शाह रहेमानगर पंचशिल नगर,वाहेदनगर,जि.एम.कॉलनी,ई.भाग या  भगातील अनेक लोकांचे घरे असुन घर नंबर नाही व आहे ते घराचे मालमत्ता कर नियमाप्रमाणे जास्तीचे आलेले दिसून येते. म्हणून मागील वर्षी रिव्हिजनमध्ये छोटे छोटे घर व मालमत्ताचेकर जास्तीचे आलेले आहे म्हणून सहायक आयुक्त,व उपआयुक्त,व एखाद्या कार्यक्षम अधिकारी मार्फत संपूर्ण परिसराचा सर्वे करुन ज्यांना मालमत्ता नबर नाही त्यांना घर नंबर देवून कर वसुल करावे व फेर सर्व्हे करुन कर आकारणी करुन कराची वसुली करावी. जेणे करुन महानगरपालिकेचा उत्पन्नात वाढ होईल करीता हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते.

**सुचकः- गफार खान गुलाम महमंद खान** **अनुमोदकः -नवल पोकर्णा**

**विषय क्र.16:-** **प्रस्ताव**

केद्र आणि राज्य सरकार वेगवेगळया पातळीवर सवलती किंवा योजना माजी सैनिकासाठी जाहिर करीत असतात, त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील औरंगाबाद महानगरपालिकेने माजी सैनिक किंवा त्याची पत्नी हयात असे पर्यत माजी सैनिकांना मालमत्ता करात 100 टक्के सुट दिलेली आहे.याच धतीवर  नावामनपा हध्दीतील

मालमत्ताधारक माजी सैनिकांना किंवा त्याची पत्नी हयात असे पर्यत मालमत्ता करात 100 टक्के सुट देणेकरीता हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः- सौ.शैलजा किशोर स्वामी** **अनुमोदकः -स.विरेद्रसिंघ गाडीवाले.**

**स्वाक्षरीत/-**
**महापौर,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.